# 'आरे'मध्ये ३३ मजली मेट्रो भवन



म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

**मुंबई तसेच परिसरातील भविष्यातील सर्व मेट्रो मार्गांचे एकाच ठिकाणाहून नियंत्रण करण्यासाठी 'एमएमआरडीए' आरे कॉलनीत ३३ मजल्यांचे मेट्रो भवन बांधणार आहे. त्यासाठी अर्थसंकल्पात १०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.**

## सर्व मेट्रो मार्गांचे एकाच ठिकाणाहून नियंत्रण

**कारण**

- भविष्यात मुंबई व परिसरात १२ मेट्रो मार्ग
- नियंत्रणासाठी एकाच यंत्रणेची आवश्यकता
- एमएमआरडीए मुख्यालयातून कामकाज अशक्य

**रचना**

- ८ हजार चौरस मीटर भूभागावर उभारणी होणार
- अर्थसंकल्पात १०० कोटी रुपयांची तरतूद
- कर्मचारी व अधिकाऱ्यांची स्वतंत्र नियुक्ती होणार

मुंबईत सध्या तीन मेट्रो मार्गांची कामे सुरू आहेत. त्यापैकी कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो-३ हा मार्ग मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या अखत्यारीत आहे. तर, उर्वरीत मार्ग 'एमएमआरडीए'च्या कार्यकक्षेत येतात. दहिसर पूर्व ते अंधेरी पूर्व, डी. एन. नगर ते मंडाळा व कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो मार्गांची कामे प्रगतिपथावर आहेत. मुंबईतील वडाळा-घाटकोपर-ठाणे-कासारवडवली या मार्गासह मुंबई परिसरात अन्य मेट्रो मार्गांची कामे हाती घेण्यात आली आहेत. येत्या काही वर्षांत एकूण १२ मेट्रो मार्ग कार्यान्वित होतील. सध्या घाटकोपर-वर्सोवा हा मेट्रो-१ मार्ग व मोनोचा वडाळा ते जेकब सर्कल हा मार्ग सुरू आहे. सर्व मेट्रो मार्ग सुरू झाल्यानंतर त्यांचे एकत्रित नियंत्रण करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणेची आवश्यकता आहे. 'एमएमआरडीए'च्या मुख्यालयातून हे कामकाज चालवणे शक्य नसेल.

'एमएमआरडीए'ची हद्द थेट पालघरपर्यंत वाढवण्यात आली आहे. त्यामुळे प्राधिकरणावरील कामाचा भार कमालीचा वाढला आहे. मुंबईसह पालघरपर्यंत पायाभूत सुविधा उभारण्याची जबाबदारी 'एमएमआरडीए'कडे आहे. त्यामुळे मेट्रोचा कारभार स्वतंत्र ठेवावा लागणार आहे. सर्वच्या सर्व १२ मेट्रो मार्गांसह घाटकोपर-वर्सोवा मेट्रो-१ तसेच मोनोचा कारभारही मेट्रो भवनातून चालवला जाणार आहे. आठ हजार चौरस मीटर भूभागावर भवन बांधले जाईल. मेट्रोचा कारभार चालवण्यासाठी कर्मचारी व अधिकाऱ्यांची स्वतंत्र नियुक्ती होईल.